दिनांक ०१/०४/२०२२

## -:- प्रेसनोट -:-

फिर्यादी यांचे घराचा मालमत्ता कर कमी करण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. प्रभु लक्ष्मण चव्हाण,वय 52 वर्षे, पद-कनिष्ठ लिपीक, नेमणुक- महानगर पालिका कार्यालय (ब) सिडको औरंगाबाद, रा. सुलतानपुर ता. खुलताबाद जि. औरंगाबाद यांनी रुपये 5000/- व विदेशी दारु ऑफिसर चॉईस एक खंबा, लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकृती केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | पोलीस ठाणे सिडको औरंगाबाद शहर गुरनं. 144/2022 कलम 7 भ्र.प्र.अ. 1988 |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. प्रभु लक्ष्मण चव्हाण,वय 52 वर्षे, पद-कनिष्ठ लिपीक, नेमणुक- महानगर पालिका कार्यालय (ब) सिडको औरंगाबाद, रा. सुलतानपुर ता. खुलताबाद जि. औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये व विदेशी दारुचा खंबा |
| लाच स्विकृती रक्कम | :- | रुपये 5000/-, विदेश दारु ऑफिसर चॉईस एक खंबा. |
| तपास अधिकारी | :- | श्री. दिलीप महादेव साबळे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे घर क्रं. एफ 5/11,एन-6, संभाजी कॉलनी,सिडको औरंगाबाद याचा मालमत्ताकर कमी करण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. प्रभु चव्हाण यांनी रुपये 5000/- व विदेशी दारु ऑफिसर चॉईस एक खंबा, मागणी करित असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. 29/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.30/03/2022 रोजी पंचासमक्षक केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. प्रभु चव्हाण यांनी फिर्यादी यांना रुपये 5000/- व विदेशी दारु ऑफिसर चॉईस एक खंबा स्विकारण्याचे मान्य करुन तात्काळ फिर्यादी यांचेककडून रुपये 1500 स्विकारले. बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 31/03/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक श्री. प्रभु चव्हाण यांनी पंचासमक्ष लाचेची मागणी करुन महानगर पालिका कार्यालय सिडको (ब) औरंगाबाद येथे लाचेची उर्वरीत रक्कम रुपये 3500/- व विदेशी दारु ऑफिसर चॉईस एक खंबा स्विकारल्यानंतर आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. रुपचंद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक- श्री. दिलीप साबळे, यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं- भिमराज जिवडे, दिगांबर पाठक, साईनाथ तोडकर, चांगदेव बागुली यांनी मदत केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net फेसबुक:- www. facebook. com-Maharashtra.gov.in
संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, पोलीस अधीक्षक :- 8888807299
अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994 पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

पोलीस उप अधिक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद
सत्यमेव जयते

(रुपचंद वाघमारे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद